# जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी यांचे कार्यालय, रत्नागिरी

**(नगरपालिका प्रशासन शाखा)**

**दुरध्वनी क्र. 02352-222483 फॅक्स- 02352-226250 E-mail- dpoduda.ratnagiri@gmail.com**


क्रमांक:नपाप्र-5//2019 दिनांक:- 13/05/2019

प्रति,

श्री. ईस्माईल तांबे,
रा. शिवाजीनगर, खेड
ता. खेड जि. रत्नागिरी

विषय:- रत्नागिरी 24×7 तक्रार निवारण कक्षातील तक्रार.

संदर्भ:-1) आपली दि. 22/04/2019 रोजी रत्नागिरी 24 × 7 तक्रार निवारण कक्षास प्राप्त झालेली तक्रार.

उक्त विषयाबाबत संदर्भांकित पत्राला अनुसरुन कळविण्यात येते की, आपण या कार्यालयाकडे दाखल केलेल्या तक्रारीवरती मुख्याधिकारी, नगरपरिषद खेड यांचेकडून या कार्यालयास प्राप्त झालेल्या दि. 10/05/2019 रोजीच्या अहवालाची प्रत यासोबत पाठविण्यात येत आहे.

सबब आपला सदरचा अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

(शिल्पा नाईक)
**जिल्हा प्रशासन अधिकारी**
**जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी**

प्रत:- पर्यवेक्षक, रत्नागिरी 24×7 तक्रार निवारण कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी यांजकडे माहितीसाठी.

D:\MUN-5\तक्रार अर्ज\24×7\खेड.docx

जा.क्र./३९७/सन २०१९-२०
खेड नगरपरिषद कार्यालय, खेड
दिनांक -१०/०५/२०१९

प्रति,

श्री.ईस्माईल तांबे
ता.खेड,जि.रत्नागिरी

विषय - श्री. सिकंदर मुसा यांचे बिल्डींग मधील सांडपाण्याच्या तक्रारीबाबत
संदर्भ - मा. जिल्हाधिकारी साहेब, रत्नागिरी यांचेकडून क्रमांक-नपाप्र-५/२०१९ दि.०६/०५/२०१९ रोजी या कार्यालयाकडे प्राप्त झालेली तक्रार (Complaint No.10/04/2019)

महाशय,

उपरोक्त विषयास व संदर्भास अनुसरुन आपणास कळविणेत येते की, आपण दिनांक ०२/०१/२०१९ रोजी श्री. सिकंदर मुसा बिल्डींग मधील संडासचे पाणी आपल्या घरासमोर येत असलेबाबत या कार्यालयाकडे तक्रार प्राप्त केली आहे. त्यास अनुसरुन श्री. सिंकदर मुसा यांना दिनांक ३०/०४/२०१९ रोजी या कार्यालयाकडून संबंधित तक्रारीबाबत नोटीस देणेत आली आहे. तसेच इमारतीतील निर्माण होणारे सांडपाणी नगरपरिषदेच्या गटारामध्ये सोडणे व सेप्टीक टँकची दुरुस्ती करुन घेणेबाबत त्यांना सूचना देणेत आल्या आहे. तसेच संबंधिताना वरील विषयी व्यवस्था न केल्यास नगरपरिषद अधिनियम १९६५ चे कलम २०१ ते २०९ नुसार कायदेशीर कारवाई करणेत येईल असे कळविणेत आले आहे.

**सोबत** - श्री. सिकंदर मुसा यांना देणेत आलेले नोटीस जोडले आहे.

मुख्याधिकारी
खेड नगरपरिषद

**प्रत - जिल्हा प्रशासन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी यांना माहितीसाठी सादर.**

# खेड नगरपरिषद खेड जि.रत्नागिरी

(तीनबत्ती नाका, मु.पो.ता.खेड, जि.रत्नागिरी)

फोन नंबर -०२३५६/२६३०२४ फॅक्स नं.-०२३५६/२६३०८० ई-मेल-khednp1940@gmail.com


जा.क्र. २५८ /२०१९ दिनांक -३०/०८/२०१९

## नोटीस

प्रति,

श्री. सिकंदर युनूस मुसा

रा.खेड ता.खेड, जि.रत्नागिरी

**विषयः** काळया यादीत समावेशा बाबत कारणे दाखवा नोटीस..

**संदर्भः** श्री इस्माईल शेखमहमद तांबे यांचा दिनांक ०७/०१/२०१९ रोजीचा आपले विरूध्द तक्रार अर्ज.

आपण नगरपरिषद हद्दीमध्ये पूर्वापार खाजगी जागा विकसित कामे करणारे विकासक आहात. आपण के.जी.एन पार्क भागामध्ये नझीर अपार्टमेंट या नावाचे अपार्टमेंटचे बांधकाम केलेले आहे. या इमारतीचे सांडपाणी बाबत श्री इस्माईल तांबे यांनी आपणास प्रत्यक्ष भेटून वारंवार सांडपाणी व्यवस्थापन करून देणेबाबत व त्यांना होणा-या त्रासाबाबत आपणास अवगत केलेले आहे. मात्र आपण यामध्ये टाळाटाळ करीत असल्याने त्यांनी संदर्भिय प्रमाणे तक्रार अर्ज या कार्यालयास दाखल केला आहे. तसेच या सांडपाण्याबाबत आपणास या पूर्वी सुध्दा नगरपरिषदेकडून कळविणेत आले होते. तरीपण आपण सांडपाण्याचे व्यवस्थापन केलेले नाही, ही बाब गंभीर स्वरूपाची आहे. तरी सदरचे पत्र मिळताच आपण बांधकाम केलेल्या इमारतीचे सांडपाणी व्यवस्थापन नगरपरिषदेच्या गटारा मध्ये जोडणेत यावे किंवा आपले भुखंडातील जागेत सोकपिट करून अंतर्गत व्यवस्थापन करावे यामध्ये आपण हयगय केलेस आपले विरूध्द नगरपरिषद अधिनियम १९६५ चे कलम २०१ ते २०९ मध्ये कायदेशीर कारवाई हाती घेणेत येईल.

उपरोक्त कार्यवाही हे नोटीस प्राप्त झालेपासून आठ दिवसात करणेत यावी अन्यथा आपण नगरपरिषद नियमांच उल्लंघन करत असल्याच्या ठपका ठेवणेत येऊन तसेच बालाजी अपार्टमेंट मध्ये आपण केलेल्या अनाधिकृत बांधकामाची कारवाई विचारात घेऊन आपणास नगरपरिषदेच्या (Black list) 'काळया यादी मध्ये' का समाविष्ट करणेत येऊ नये यांचा समर्पक खुलासा करावा. खुलासा वेळीच सादर न केलेस काळया यादीत समावेश होणेस आपली काहीच तक्रार नाही असे गृहीत धरून उक्त कारवाई आपले विरूध्द हाती घेणेत येईल याची नोंद घ्यावी.

KHED MUNICIPAL COUNCIL
खेड नगरपरिषद जि. रत्ना.
KHED, DIST.RATNAGIRI

मुख्याधिकारी
खेड नगरपरिषद